**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ३५३/२०२३ मधील निशाणी क्र. ५० वरील आदेश</u>**

(काशिनाथ दगडु साबळे वि. बाळु रोकडे व इतर)

(सीएनआर नं. एमएचएनएस२९००१९५५—२०२३)

अर्जदाराने सदरचा अर्ज वादी काशिनाथ दगडु साबळे यांचे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा खरेदीखत रद्द करणेकामी, घोषणा व निरंतर ताकीदीकामी नाशिक येथील वरीष्ठ स्तर न्यायालयात दि. ०९/०५/२०१७ रोजी दाखल केला आहे. दावा प्रंलबित असताना वादीचा मुत्यु दिनांक ०६.०९.२०२० रोजी झाला आहे. त्यामुळे वादी करीता प्रस्तुत दावा दिनांक ०६.१२.२०२० रोजी अवसायन पावला आहे. दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्जदाराने दि. ०६/०२/२०२१ पुर्वी अर्ज देणे गरजेचे होते. अर्जदाराने सदर अर्ज दि. २१/०२/२०२६ रोजी दाखल केला आहे. त्यामूळे दावा अवासायन पावल्याचा आदेश रद्द करुन घेणेकरीता अर्ज दाखल करणेस ५ वर्षे १५ दिवस विलंब झाला आहे. वादीचे पश्चात त्यांचे कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दावा चालविण्याचा हक्क प्राप्त होतो. त्यामूळे अर्ज दाखल करणेस झालेला विलंब पाहता प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टिने योग्य होईल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब अर्जदाराने दंड रक्कम रु. १०००/— तालुका विधी सेवा प्राधिकरणात भरल्यानंतर माफ करण्यात येतो.

NANAWARE MOHINI DATTATRAY

Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.07.17 15:51:03 +0530

स्थळः— इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांकः— १७/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.